- **प्रकल्प सुरू होण्यापूर्वीचे रोजगार** यात सीबीओचे आरओसी नोंदणीपासून प्रकल्पाच्या अंतर्गत एफपीपी मंजुरीपर्यंतचा कालावधी समाविष्ट आहे. या कालावधी मध्ये जे प्रकल्पामध्ये काम करतात त्या सर्वांचा समावेश या मध्ये होतो.
- **प्रकल्प सुरू झाल्यानंतरचे रोजगार** यात प्रकल्पाच्या अंतर्गत एफपीपी मंजुरीनंतरचा कालावधी समाविष्ट आहे. या कालावधी मध्ये जे प्रकल्पामध्ये काम करतात त्या सर्वांचा समावेश या मध्ये होतो.
- फॉर्ममध्ये दोन प्रकारच्या रोजगाराची डेटा एंट्रीची मागणी केली जाते:
  1.कायमस्वरूपी
  2.तात्पुरता/मोसमी/ पूर्ण वेळ नसलेला रोजगार
- **कायमस्वरूपी कर्मचारी** म्हणजे ज्यांच्याकडे पूर्ण वेळ रोजगार उपलबद्ध असून त्याचा पगार वेळोवेळी भेटतो. कायमस्वरूपी कर्मचारी हे असे सर्व असे कर्मचारी आहेत ज्यांच्याकडे रोजगाराचा स्पष्ट (लिखित किंवा तोंडी) किंवा करार असतो. त्यांचे किमान कामाचे दिवस प्रति वर्ष 240 आणि किमान कामाचे प्रति दिन 7 तास असावेत.
- **तात्पुरता रोजगार** मध्ये निश्चित मुदतीच्या कराराखालील काम समाविष्ट आहे,. कामाची अंतिम तारीख समाविष्ट असते.
- **मोसमी रोजगार** म्हणजे ते कामगार ज्यांना नमूद केलेल्या कालावधी साठी रोजगार उपलबद्ध असतो जो रोजगार हा कराराचा वेळ आणि कालावधी हा हवामान, सार्वजनिक सुट्ट्या आणि/किंवा शेती पिकांसारख्या ऋतूबद्ध घटकांनी प्रभावित होतो.
- **पूर्ण वेळ नसलेला रोजगार** म्हणजे ते कामगार ज्यांचा काम करण्याचा वेळ सामान्यपेक्षा लक्षणीय कमी असतो'. ही व्याख्या सर्व प्रकारच्या अंशकालीन कामांना (अर्धदिवस काम, आठवड्यात एक, दोन किंवा तीन दिवस काम, इत्यादी) आयएलओच्या व्याख्ये नुसार व्यापते. ओईसीडीने आठवड्याला ३० तासांपेक्षा कमी असलेल्या सामान्य कामकाजाच्या तासांच्या संदर्भात अंशकालीन काम व्याख्यित करण्याचा निर्णय घेतला आहे.
- **वास्तविक कामाचे तास** यात पूर्णवेळ, अंशकालीन कामगारांचे नियमित कामकाजाचे तास, अतिरिक्त केलेले कामाचे तास समाविष्ट आहेत. यामधून सार्वजनिक सुट्ट्या, वार्षिक सुटी, स्वतःचे आजारपण, दुखापत आणि तात्पुरती अपंगत्व, मातृत्व सुटी, पालकत्व सुटी, शालेय किंवा प्रशिक्षण, तांत्रिक किंवा आर्थिक कारणांसाठी सुस्त काम, संप किंवा कामगार वाद, खराब हवामान, भरपाई सुटी आणि इतर कारणांमुळे न काम केलेला वेळ वगळला जातो.
- **रोजगार निर्मिती हि नमूद केलेल्या वर्षामध्ये किती झाले आहे** त्याचीच माहिती भरण्यात यावी. या मध्ये कायमस्वरूपी रोजगार आणि तात्पुरता रोजगार/ मोसमी रोजगार/ पूर्ण वेळ नसलेला रोजगार यांचा समावेश होतो.

- **पूर्णकालीन समतुल्य रोजगार:**

(((पुरुष कायमस्वरूपी कर्मचारींची संख्या * वर्षातील काम केलेले दिवस * दिवसातला काम केलेले तास) / 7) +((स्त्री कायमस्वरूपी कर्मचारींची संख्या * वर्षातील काम केलेले दिवस * दिवसातला काम केलेले तास) / 7) +((पुरुष तात्पुरत्या कर्मचारींची संख्या * वर्षातील काम केलेले दिवस * दिवसातला काम केलेले तास) / 7) +((स्त्री तात्पुरत्या कर्मचारींची संख्या * वर्षातील काम केलेले दिवस * दिवसातला काम केलेले तास) / 7)) / 240

- **महिलांसाठी पूर्णकालीन समतुल्य रोजगार:**

(((स्त्री कायमस्वरूपी कर्मचारींची संख्या * वर्षातील काम केलेले दिवस * दिवसातला काम केलेले तास) / 7) +((स्त्री तात्पुरत्या कर्मचारींची संख्या * वर्षातील काम केलेले दिवस * दिवसातला काम केलेले तास) / 7)) / 240

- **अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीसाठी पूर्णकालीन समतुल्य रोजगार:**

(((अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती पुरुष कायमस्वरूपी कर्मचारींची संख्या * वर्षातील काम केलेले दिवस * दिवसातला काम केलेले तास) / 7) + ((अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती स्त्री कायमस्वरूपी कर्मचारींची संख्या * वर्षातील काम केलेले दिवस * दिवसातला काम केलेले तास) / 7) + ((अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती पुरुष तात्पुरत्या कर्मचारींची संख्या * वर्षातील काम केलेले दिवस * दिवसातला काम केलेले तास) / 7) + ((अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती स्त्री तात्पुरत्या कर्मचारींची संख्या वर्षातील काम केलेले दिवस * दिवसातला काम केलेले तास) / 7)) / 240

स्रोत: मॉनिटरिंग आणि मूल्यमापन -एम & ई टूलकिट, खंड १ - जागतिक बँक